0 8 JUL 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर नोंदणीची मुदत वाढविली

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय; ११ जुलैपर्यंत नोंदणीचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या (सिनेट) प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक, विद्यापरिषदेमध्ये निवडून द्यावयाचे आठ शिक्षक आणि अभ्यास मंडळासाठी निवडून द्यावयाचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत विद्यापीठाने दि. ११ जुलैपर्यंत वाढविली.

या ऑनलाईन नोंदणीसाठी विद्यापीठाने गुरुवारपर्यंत मुदत दिली होती. दुपारी तीन वाजेपर्यंत ३९,५०० नोंदणीकृत पदवीधरांनी, २०० महाविद्यालयांच्या शिक्षकांची, १८७ महाविद्यालयांच्या विभागप्रमुखांची, १२८ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची आणि १०७ व्यवस्थापन प्रतिनिधींनी नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली आहे. जास्तीत जास्त मतदारांना नोंदणी करता यावी यासाठी ही मुदत दि. ११ जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे. कोणीही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधितांनी घेऊन या मुदतीमध्ये ऑनलाईन अर्ज भरावेत.

ऑनलाइन भरलेली माहिती अथवा अर्ज आवश्यक कागदपत्रासह विद्यापीठ कार्यालयाकडे दि. १५ जुलैला सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्थळप्रत स्वरूपात जमा करावेत, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सिनेट पदवीधर नोंदणीसाठी सोमवारपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सिनेट पदवीधर नोंदणीसाठी दि. ११ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठ अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक तसेच विद्यापरिषदेत निवडून द्यायचे आठ शिक्षक व अभ्यास मंडळासाठी निवडून द्यायचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करणे व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी २०२२ मधील नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ऑनलाईन अर्जाची मुदत ३० जून व त्यानंतर ७ जुलैपर्यंत वाढविण्यात आली. ३९ हजार ५०० नोंदणीकृत पदवीधर, २०० महाविद्यालय शिक्षक, १८७ महाविद्यालय विभागप्रमुख, १२८ महाविद्यालय प्राचार्य, १०७ व्यवस्थापन प्रतिनिधींची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. अधिकाधिक मतदारांना नावनोंदणी करता यावी यासाठी चार दिवसांची मुदतवाढ दिली आहे. ऑनलाईन भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे १५ जुलैपर्यंत सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाठविण्यास मुदतवाढ दिल्याचे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे.

पुण्यनगरी

# अधिसभा : मतदार नोंदणीस मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा मतदार नोंदणीसाठी १५ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे मतदार यादी तयार करून माहिती ऑनलाईन भरण्यासाठी दि. ११ जुलैपर्यंत, तर भरलेली माहिती विद्यापीठ कार्यालयाकडे पाठवण्यासाठी १५ जुलैपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. दरम्यान, गुरुवारी ३९ हजार ५०० पदवीधरांनी, २०० महाविद्यालयांच्या शिक्षकांनी, १८७ महाविद्यालयांच्या विभागप्रमुखांनी, १२८ प्राचार्यांनी, तसेच १०७ व्यवस्थापन प्रतिनिधींनी ऑनलाईन नोंदणी केली.

तरूण भारत

# पदवीधर मतदार नोंदणीसाठी १५ जुलैपर्यंत मुदतवाढ

- ३९ हजार ५०० पदवीधर मतदारांनी केली ऑनलाईन नावनोंदणी
- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परिपत्रक जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी पदवीधर मतदार नावनोंदणीला ७ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली होती. त्यामुळे याचा फायदा घेत ३९ हजार ५०० पदवीधर मतदारांनी ऑनलाईन नावनोंदणी केली आहे. तसेच २०० महाविद्यालयांच्या शिक्षकांची, १८७ महाविद्यालय विभागप्रमुखांची, १२८ महाविद्यालय प्राचार्यांची आणि १०७ व्यवस्थापन प्रतिनिधींची ऑनलाईन नोंदणी केली आहे. तसेच शिक्षण संस्थांच्या मागणीनुसार १५ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, या आशयाचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर, शिक्षक तसेच विद्यापरिषदेची निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणार आहेत. अधिकाधिक मतदारांना नावनोंदणी करण्यासाठी दोनवेळा मुदतवाढ दिली आहे. याचा फायदा घेत विविध शिक्षण संस्था, विद्यार्थी संघटनांनी जास्त नावनोंदणी करून आतापर्यंतच्या विद्यापीठ निवडणुकीत इतिहास घडवला आहे.

Times of India

# SUK issues fresh schedule for summer exams

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has issued a fresh schedule for summer examination of diploma, degree, postgraduation and other courses.

As per the new schedule, the exams will now begin from July 19. According to an official from the SUK, the earlier schedule was scrapped after demand was made by the students that all exams must be held offline in the Multiple Choice Question (MCQ) format.

Earlier, the exams were supposed to take place in the descriptive answer format. However, the academic council of the university, after deliberation with experts took the final call of conducting the exams in the MCQ format. As per statement issued by the SUK, each paper will have 25 questions of two marks — a total of 50 marks. The students will get one hour to solve the paper and there will be no negative marking.

The university has categorically stated that the paper will be framed on the whole syllabus and not partial syllabus as was the case during pandemic for online exams. The students will be allocated exam centres. According to the university, over 2 lakh students from over 561 different courses will appear for the exams.